**वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाच्या बातमीसाठी**

## प्रेसनोट

**आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासी सेवक / सेवा संस्था पुरस्कार प्रदान करणे**

---

आदिवासी विकास विभागातर्फे सन १९८४ - ८५ पासून हा पुरस्कार सुरु करण्यात आला असुन दरवर्षी १५ आदिवासी सेवक आणि ७ आदिवासी सेवा संस्था या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

आदिवासी उपयोजना व उपयोजना बाहेरील क्षेत्रात आदिवासींच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी शासन राबवित असलेल्या योजनांची माहिती आदिवासी जनतेपर्यंत पोहचविणे, जनजागृती करणे, शिक्षणाचे, स्वयंरोजगाराचे महत्व पटवून देणे, स्वच्छता, कुटूंब नियोजन, बालविवाहाची प्रथा बंद करणेसाठी समाज जागृती, समाज शिक्षण, सामुहीक विवाह इत्यादी बाबतीत सेवाभावी वृत्तीने बहूमोल कार्य करणाऱ्या व्यक्ती आढळून येतात अशा क्रियाशील सेवाभावी व्यक्ती व संस्थांना त्यांचे कार्यासाठी अधिक प्रोत्साहीत करण्याकरीता आदिवासी विकास विभागामार्फत पुरस्कार देऊन सन्मानीत करण्याचे विचाराधीन आहे.

निवड होणाऱ्या व्यक्तीस आदिवासी सेवक आणि संस्थेस आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. पुरस्काराचे स्वरुप आदिवासी सेवकांना प्रत्येकी रु.१०,००१ रोख रक्कम, सन्मानचिन्ह तसेच आदिवासी सेवा संस्थांना प्रत्येकी रु.२५,००१ रोख रक्कम व सन्मानचिन्ह असे आहे.

**सन २००९-१० आणि २०१०-११ या दोन वर्षांचे पुरस्कार वितरण करण्यासाठी आदिवासी सेवक आणि सेवा संस्थांकडुन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. आदिवासी क्षेत्रात वरील प्रमाणे काम करणाऱ्या आदिवासी सेवक आणि सेवा संस्था यांनी आपल्या कार्याची सविस्तर माहिती असलेले विहित नमुन्यातील प्रस्ताव त्यांचे कार्यक्षेत्रातील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे दिनांक ५ नोव्हेंबर २०१० पर्यंत सादर करावेत नमुना अर्ज प्रकल्प कार्यालयात विनामुल्य उपलब्ध होतील असे आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी आवाहन केले आहे.**

आयुक्त, आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य, नाशिक